**श्री विठ्ठल रखुमाई वारकरी योजनेअंतर्गत तातडीने मदत देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**मदत व पुनर्वसन विभाग**

**शासन निर्णय क्र एससीवाय-२०२६/प्र.क्र. ४७/मदत-३**

मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय,मुंबई-४०००३२.

दिनांक:- १७ जुलै, २०२६

**संदर्भ:-१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दि.२७.०३.२०२३.**

**२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एससीवाय-२०२६/प्र.क्र.३५/मदत-३, दि.०८.०४.२०२६.**

**३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. सीएलएस-२०२३/प्र.क्र.१३२/म-३, दि.१०.०७.२०२६.**

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठलाच्या आषाढी / कार्तिकी वारीसाठी पंढरपूरला येणाऱ्या वारकऱ्यांकरिता, वारीच्या कालावधीत (वारी सुरु झाल्याच्या दिनांकापासून ते वारी समाप्त होण्याच्या दिनांकापर्यत ) अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या निकटच्या वारसदारास अथवा जखमी झालेल्या वारकऱ्यांसाठी इस्पितळाचा खर्च, अपंगत्व यासाठी मदत तातडीने देणे शक्य व्हावे याकरिता उणे प्राधिकार पत्रावर कोषागारातुन रक्कम आहरित करण्यासाठी मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

आषाढी वारी-२०२६ दरम्यान (वारी सुरु झाल्याच्या दिनांकापासून ते वारी समाप्त होण्याच्या दिनांकापर्यंत-दिनांक ०७ जुलै ते २५ जुलै, २०२६ कालावधीत) अपघाताने अथवा दुर्घटनेत मूत्यू पावलेल्या अथवा जखमी झालेल्या वारक-यांसाठी मदत देण्याबाबत दिनांक १०.०७.२०२६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. आता, आषाढी / कार्तिकी वारी कालावधीत ( वारी सुरु झाल्याच्या दिनांकापासून ते वारी समाप्त होण्याच्या दिनांकापर्यंत ) अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यु पावलेल्या अथवा जखमी झालेल्या, अपंगत्व आलेल्या वारकऱ्यांसाठी तातडीने मदत देणे शक्य व्हावे याकरिता

जिल्हाधिकारी यांना उणे प्राधिकार पत्रावर कोषागारातुन रक्कम आहरित करण्यासाठी प्राधिकृत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत योजना आषाढी / कार्तिकी वारी करिता श्री क्षेत्र पंढरपूर येथे पायी अथवा खाजगी वाहनाने /सार्वजनिक वाहनाने जाणाऱ्या वारकऱ्यांकरिता लागू राहील. तसेच संबंधित वारकरी आषाढी / कार्तिकी वारी करिता श्री क्षेत्र पंढरपूर येथे गेल्याबाबतचे संबंधित तहसिलदार यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. तहसिलदार यांनी संबंधित वारकरी आषाढी / कार्तिकी वारी करिता गेल्याची खात्री करुन तशा स्वरुपाचे प्रमाणपत्र मागणीनुसार संबंधित वारकरी अथवा त्याचे वारसदार यांना द्यावे.

३. या योजनेंतर्गत मदतीसाठी संबंधित वारकरी / वारकरी यांच्या वारसाने जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक राहील. राज्य शासनाकडून याकरिता देण्यात येणारी मदत संबंधितांना मंजूर करुन वितरीत करण्याकरिता जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांनी या योजनेंतर्गत मदत मागणीचा अर्ज आल्यास, तहसिलदार यांचे प्रमाणपत्र, मृत्यू दाखला, वैद्यकीय प्रमाणपत्र याची पडताळणी करून वारक-यास / वारकऱ्यांना वारी कालावधीत झालेल्या अपघाताचे स्वरूप/व्याप्ती विचारात घेऊन संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयानुसार प्रकरण निहाय खालील प्रमाणे मदत मंजूर करून वितरीत करावी.

| अ.क्र. | बाब | मदत |
|---|---|---|
| १ | अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या निकटच्या वारसदारास | रु.४.०० लाख |
| २ | वारी दरम्यान अपंगत्व आलेल्या वारकऱ्यांना | |
| | (अ) ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास | रु. ७४ हजार |
| | (ब) ६० टक्केहुन अधिक अपंगत्व आल्यास | रु. २.५० लाख |
| ३ | एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधी करिता इस्पितळात दाखल झाल्यास | रु. १६ हजार |
| ४ | एक आठवड्यापेक्षा कमी कालावधी करिता इस्पितळात दाखल असल्यास | रु. ५४००/- |

४. संदर्भ क्र. ३ येथील दिनांक १०.०७.२०२६ च्या शासन निर्णयान्वये या प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्र.सी-६; मुख्य लेखाशीर्ष २२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य; ०२ पूर, चक्रीवादळे इ.; १०१, सानुग्रह अर्थसहाय्य; (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च; (९२) (०१) रोख भत्ता , मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना सहाय्य व जखमींना मदत (अनिवार्य), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ २१९४) अंतर्गत करण्यात यावा नमुद केलेले आहे.

तथापि, आता प्रस्तुत प्रयोजनासाठी होणारा खर्च जिल्हाधिकारी यांना उणे (-) प्राधिकार प्रदान केल्याने आर्थिक वर्ष २०२६-२७ करिता हा मागणी क्र.सी-६; मुख्य लेखाशीर्ष २२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी अर्थसहाय्य; ०२ पूर, चक्रीवादळे इ.; १०१, अनुग्रह सहाय्य; (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च; (९१) (०१) रोख भत्ता, मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना सहाय्य व जखमींना मदत (अनिवार्य), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ ०१५५) अंतर्गत करण्यात यावा.

५. शासन मान्यता प्राप्त झालेल्या तथापि, मदत वितरीत न केलेल्या प्रस्तावांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात उक्त लेखाशिर्षाअंतर्गत (२२४५०१५५) मदत वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७१७१४१०२८६५४१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VINAY PANDURANG LOKHANDE

Digitally signed by VINAY PANDURANG LOKHANDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Relief and Rehabilitation, 2.5.4.20=EEDFE3322D40AD245C8F52370F8D8B4D8B94B560A370AEAF4D3AA33C9369DE3A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=889A1BA1DD6F599D5354C2F03ECDBB310A43140A80414FAD46DF22CBD7755A8F, cn=VINAY PANDURANG LOKHANDE
Date: 2026.07.17 14:11:30 +05'30'

**( विनय लोखंडे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण , सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमासह)) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री ( राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ़ विभाग ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री ( मदत व पुनर्वसन विभाग ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री ( सर्व ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री ( सर्व ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. विधान मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य
८. अपर मुख्य सचिव ( वित्त), मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
१०.सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मुंबई.
११.सर्व विभागीय आयुक्त
१२.सर्व जिल्हाधिकारी
१३.संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मंत्रालय, मुंबई.

१४.मा.महालेखापाल -१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
१५.मा.महालेखापाल -१/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
१६.संचालक, लेखा व कोषागरे, मंत्रालय, मुंबई
१७.वित्तीय सल्लागार व सह सचिव, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१९.सर्व जिल्हा कोषागर अधिकारी
२०.वित्त विभाग (व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय, मुंबई
२१.उप सचिव, (ब-१/२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२२.अवर सचिव, मदत-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२३..निवडनस्ती (मदत-३)